# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३१२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## प्रजासत्ताक दिनासाठी सर्वात मोठ्या मुस्लिम देशाच्या राष्ट्रपतींना निमंत्रण; पाकिस्तानलाही जाण्याच्या चर्चेने पेच फसला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नवी दिल्ली**

येत्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जगातील सर्वात मोठ्या मुस्लिम देशाचे राष्ट्रपती भारतात प्रमुख पाहुणे म्हणून येणार आहेत. परंतू, त्यांच्या येण्यापुर्वीच पाकिस्तानने ते आपल्याकडेही येणार आहेत, असे दावे केल्याने हा दौरा वादात सापडण्याची चिन्हे आहेत.



इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबावो सुबियांतो हे प्रजासत्ताक दिनादिवशी भारतात येणार आहेत. ही काही त्यांची पहिलीच वेळ नाहीय, यापूर्वीही इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रजासत्ताक दिनाला प्रमुख पाहुणे म्हणून आलेले आहेत. परंतू. यावेळचा पेच जरा वेगळा आहे. भारत-पाकिस्तानचे ताणलेले संबंध सर्व जगाला माहिती आहेत. पाकिस्तानी मीडियाने सुबियांतो हे २६ जानेवारीला पाकिस्तानातही जाणार असल्याचा दावा केला आहे.

भारत दौऱ्यावर असताना सुबियांतो यांनी त्यात पाकिस्तानचाही दौरा करावा अशी भारताची इच्छा नाहीय. यामुळे सुबियांतो यांच्या भारत दौऱ्याची घोषणा करण्यात आलेली नाही. पाकिस्तानी मीडियानुसार सुबियांतो तीन दिवसांच्या पाकिस्तान दौऱ्यावर येणार आहेत, असे म्हटले आहे.

टाईम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, भारताने अलिकडच्या काळात परदेशी नेत्यांना भारत आणि पाकिस्तानशी असलेले संबंध वेगळे ठेवण्याचे आणि त्यांच्या भारत भेटीदरम्यान पाकिस्तानला त्यांच्या भेटीचा भाग बनवू नये असे आवाहन केले आहे. भारताने इंडोनेशियाकडे राजनैतिकदृष्ट्या हा मुद्दा उपस्थित केला आहे आणि प्रजासत्ताक दिनाच्या समारंभानंतर सुबियांतो थेट पाकिस्तानला जाणार नाहीत अशी आशा व्यक्त केली आहे.

परेडनंतर इतक्या लवकर इस्लामाबादला भेट देणे भारतासाठी नकारात्मक संकेत देऊ शकते. डिसेंबरमध्ये इजिप्तमध्ये झालेल्या बहुपक्षीय कार्यक्रमादरम्यान, सुबियांतो यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची भेट घेतली आणि दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्य वाढवण्याबद्दल चर्चा केली होती. याचाच भाग म्हणून सुबियांतो पाकिस्तानला जाऊ शकतात, असे म्हटले जात आहे.

## सीआयडी कोठडीत वाल्मीक कराडची झोप उडाली
## डोळे लालबुंद अन् प्रचंड तणाव, डॉक्टरांकडून तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०बीड**

पवनचक्की कंपनीला दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्याच्या आरोपात सीआयडी कोठीत असणाऱ्या वाल्मीक कराडची अवस्था बिकट झाली आहे. वाल्मीक कराड सध्या तणावात असून त्याला व्यवस्थित झोपही येत नसल्याने त्याचे डोळे लाल झाले होते. डॉक्टरांनी बुधवारी सायंकाळी ७ वाजता त्याची तपासणी केली. त्यानंतर नेत्ररोग तज्ज्ञांना कॉल दिला. ९ वाजता त्यांनी तपासणी करून औषधोपचार केले. जास्तीचे जागरण आणि तणावामुळे असे डोळे लाल होऊ शकतात, असं तज्ज्ञांनी सांगितलं. वाल्मीक कराड याने विष्णू चाटेच्या मोबाइलवरून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांना खंडणी मागितल्याचा आरोप आहे. याबाबतचे कॉल रेकॉर्डिंगही सीआयडीच्या हाती लागल्याचे समजते. त्यामुळे वाल्मीक कराडचा पाय खोलात गेला असून



कारवाईच्या भीतीने आता त्याचे झोप उडाल्याचं दिसत आहे.

**कराडसोबत आलेल्यांची चौकशी?**

वाल्मीक कराड हा ३१ डिसेंबर २०२४ रोजी पुण्यात शरण आला. यावेळी त्याच्यासोबत दोन व्यक्तृती आणि पांढरी गाडी होती. ही गाडी आता सीआयडीने जप्त केली आहे. गाडीमालक शिवलिंग मोराळेसह अन्य मदत करणारे लोक देखील सीआयडीच्या रडारवर आहेत.

## वक्फ बोर्डाच्या नावाखाली घेतलेल्या प्रत्येक इंच जमिनीचा ताबा परत घेणार

### योगी आदित्यनाथ यांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०प्रयागराज**

देशात अनेक मंदिर-मशीदीचे वद निर्माण झाले आहेत. या वादावर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले, वारसा पुन्हा मिळवणे ही वाईट गोष्ट नाही. महाकुंभमेळ्यापूर्वी ते आजतकच्या धर्म संसद कार्यक्रमात बोलत होते. त्यांनी वक्फ मालमत्तासंदर्भातही टिप्पणी केली.

वारसा परत मिळवणे ही वाईट गोष्ट नाही. सनातनचे पुरावे आता संभलमध्ये दिसत आहेत. वादग्रस्त वास्तूंना मशीद म्हणू नये. मुस्लिम लीगच्या मानसिकतेवर भारत चालवला जाणार नाही, असे आदित्यनाथ यांनी शाही जामा मशीद वादाचा संदर्भ देत म्हटले.प्रयागराजमधील महाकुंभ वक्फ जमिनीवर आयोजित केल्याचा दावा एका मौलवीने केल्यानंतर योगी आदित्यनाथ यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले, वक्फच्या बहाण्याने घेतलेल्या प्रत्येक इंच जमिनीवर राज्य सरकार पुन्हा दावा करेल. ते म्हणाले, कुंभ हे हजारो वर्षांपासून भारताच्या



वारशाचे प्रतीक आहे आणि येथे नेहमीच होत आले आहे. ते वक्फ बोर्ड नसून भूमाफियांचे मंडळ आहे. आदित्यनाथ म्हणाले की सरकार अशा सर्व ताब्यात घेतलेल्या जमिनीची चौकशी करत आहे आणि कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. जिथे 'वक्फ' हा शब्द दिसतो, तेथे मूळ जमीन कोणाच्या नावावर नोंदवली गेली हे तपासले जाईल आणि ती जमिन हक्काच्या मालकांना परत करण्याचा प्रयत्न केला जाईल, असंही आश्वासन योगी आदित्यनाथ यांनी दिलं.

२०१३ मध्ये, मॉरिशसचे पंतप्रधान गंगेत पवित्र स्नान करण्यासाठी भारतात आले होते, तेव्हा कुंभ दरम्यान प्रदूषण, अस्वच्छता आणि गैरव्यवस्थापन पाहून ते परत गेले, असे आदित्यनाथ म्हणाले. २०१३ मध्ये राज्यात समाजवादी पक्षाची सत्ता होती, तेव्हा अखिलेश यादव मुख्यमंत्री होते.

ते म्हणाले की, सरकारच्या डबल इंजिनच्या कामामुळे गंगा आता स्वच्छ झाली आहे. जेव्हा २०१९ मध्ये मॉरिशियन पंतप्रधानांनी वाराणसीला भेट दिली, तेव्हा त्यांनी प्रयागराजला भेट दिली जिथे कुंभ सुरू होता. सहा वर्षांत झालेला बदल पाहून त्यांनी आपल्या कुटुंबासह संगमात पवित्र स्नान केले, अशी आठवणही योगी आदित्यनाथ यांनी सांगितली.

## 'वार' हे आडनाव आल्याबरोबर आमचे हात नेहमी पुढे असतात - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०चंद्रपूर**

कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांची आज १२५ वी जयंती आहे. या निमित्ताने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. दादासाहेब कन्नमवार यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजक भाजपाचे आमदार किशोर जोरगेवार होते. तसेच या कार्यक्रमासाठी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. मात्र, या कार्यक्रमात भाजपाचे नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित नव्हते. त्यामुळे सुधीर मुनगंटीवार हे नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांच्या १२५ व्या जयंतीच्या कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूर जिल्ह्यासह विविध विषयांवर भाष्य केलं. तसेच आम्ही 'वार' आडनाव असलेल्या लोकांचा नेहमी सन्मान करतो, असं म्हणत फडणवीस यांनी मुनगंटीवार, वडेट्टीवार, जोरगेवार यांच्या नावाचा उल्लेख केला.

मला माहिती आहे की चंद्रपूर हा जिल्हा वाघ आणि 'वार'चा जिल्हा आहे. सुधीर मुनगंटीवार हे आमचे नेते आहेत, तसेच विजय वडेट्टीवार आणि किशोर जोरगेवार हे आमचे मित्र आहेत. त्यामुळे मी सांगतो की कुठलेही 'वार' असले तरी आम्ही त्यांचा सन्मान करतो. कारण आम्ही हेडगेवारांचे अनुयायी आहोत.



त्यामुळे 'वार' हे आडनाव आल्याबरोबर आमचे हात नेहमी पुढे असतात, असं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं.दादासाहेब कन्नमवार यांनी जास्त शिक्षण न घेताही त्यांनी आपलं व्यक्तिमत्व तयार केलं. महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळक यांचा एक मोठा पगडा कन्नमवार यांच्यावर होता. त्या विचारातून त्यांचं नेतृत्व तयार होत गेलं. त्या काळात ते वेगवेगळ्या आंदोलनात सहभागी झाले, त्यांनी कॉंग्रेसचं काम सुरु केलं. आपलं जे ध्येय आहे ते पूर्ण झाल्याशिवाय आपल्याला शांत बसता येणार नाही, अशा प्रकारची ती सर्व मंडळी होती. त्यामुळे त्यांनी एक मोठं संघटन उभं केलं. ज्या वेळी संयुक्त महाराष्ट्र तयार झाला तेव्हा संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कोण? असा प्रश्न होता तेव्हा विदर्भातील ५४ आमदारांचं मत होतं की आताच वेळ आहे. आपण आताच वेगळ्या विदर्भासाठी मागणी करू. मात्र, तेव्हा दादासाहेब कन्नमवार यांनी भूमिका घेतली की आता ही वेळ नाही. आता आपण महाराष्ट्र एकत्रित केला पाहिजे. आपल्याला महाराष्ट्राला पुढे न्यायचं आहे. मग तेव्हा यशवंतराव चव्हाण यांच्या पाठिमागे आपण उभं राहिलं पाहिजे. त्यामुळे दादासाहेब कन्नमवार यांच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण यांना त्या काळात एक मोठं पाठबळ मिळालं, असंही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**देवेंद्र फडणवीस यांचा उद्धव ठाकरेंना टोला?**

चंद्रपूर जिल्ह्याच्या ज्या काही अडचणी त्या आपण सगळे मिळून सोडवू. त्यामुळे जिल्ह्याला वाली नाही असं म्हणता येणार नाही. आपण सगळेच वाली आहोत, सुग्रीव कुणीही नाही. हा कुणासारखा जोक झाला ते सांगत नाही तुम्हाला माहीत आहे. असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना हा टोला लगावला अशी चर्चा आहे.

## काँग्रेसची पाठ सरळ व्हायला तयार नाही, महाराष्ट्रातही 'मविआ'त ठिणगी! राष्ट्रवादी-काँग्रेस आमने-सामने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीमध्ये फूट पडल्यानंतर आता महाराष्ट्रातही महाविकास आघाडीमध्ये ठिणगी पडल्याचे पाहायला मिळत आहे. विधानसभा निवडणुकीतल्या पराभवारुन महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये घमासान सुरु झालंय. विधानसभेसाठी जागावाटपात वेळ घालवल्यामुळे पराभवाला सामोरं जावं लागल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि नितीन राऊत यांनी केला आहे. यावरुन आता शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी मरगळ झटका आणि कामाला लागा असा सल्ला दिला. त्यावर प्रत्युत्तर देताना विजय वडेट्टीवार यांनी अमोल कोल्हेंनी आपल्या पक्षाकडे लक्ष द्यावं असा सल्ला दिला आहे. त्यामुळे आता महाविकास आघाडीमध्ये वाद आणखी वाढण्याची शक्यता आहे.



विधानसभा निवडणुकीत पराभवाचा जोरदार झटका बसल्यानंतर महाविकास आघाडीतील धुसफूस आता बाहेर येऊ लागली आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला चांगलं यश मिळालं होतं मात्र विधानसभेला त्यांनी सपाटून मार खाल्ला. तिन्ही पक्षांना मिळून ५० जागांचा आकडाही गाठता आला नाही. त्यावरुन तिन्ही पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात मतभेद झाल्याचे पाहायला मिळालं. अशातच मविआच्या नेत्यांनी जागावाटपात वेळ वाया घालवला असा आरोप काँग्रेस नेत्यांनी केली.

**ठाकरे गट अजूनही झोपेत – अमोल कोल्हे**

दुसरीकडे अमोल कोल्हे यांनी शरद पवार गटाच्या बैठकीत काँग्रेस पक्षाची मोडलेली पाठ अजून सरळ व्हायला तयार नाही, तर ठाकरे गट अजूनही झोपेतून जागा व्हायला तयार नाही असं वक्तव्य केल्याचे म्हटलं जात आहे. यावरुनच विजय वडेट्टीवार यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. अमोल कोल्हेंनी आपल्या पक्षाकडे थोडं अधिक लक्ष द्यावं आणि आम्हाला सल्ला जर थोडा कमी द्यावा, असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

## पीडब्ल्यूडीमधून आदिवासींची २९ राखीव पदे गायब; धक्कादायक माहिती समोर

### अजब-गजब कारभार; अधिसंख्य केले १०९, रिक्त दाखविली ८० पदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागातून अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेली तब्बल २९ पदे गायब झाली असल्याची धक्कादायक बाब माहिती अधिकारातून पुढे आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागात गट 'अ' ते 'ड' संवर्गात एकूण मंजूर पदे १४ हजार १८१ आहेत. यापैकी अनुसूचित जमातीसाठी १ हजार ६० पदे राखीव आहेत. अनुसूचित जमातींची भरलेली पदे ८५८ आहेत. २०२ पदांचा पूर्वीचा अनुशेष शिल्लक आहे. जातवैधता प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांची संख्या ७४८ आहे. ११० जणांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या १०९ आहे.

**असा आहे रिक्त पदांचा समावेश**

यात आस्थापना- ३, सेवा १, सेवा २, सेवा ३. प्रशासन ४, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, मुख्य अभियंता (विद्युत) मुंबई, मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) मुंबई, मुख्य वास्तुशास्त्र, संचालक उपवने व उद्याने या १५ विभागातील पदांचा समावेश आहे.

**अनुसूचित जमाती पदभरती तपशील**

| संवर्ग | एकूण मंजूर पदे | राखीव पदे | भरलेली पदे | अधिसंख्य पदे |
|---|---|---|---|---|
| गट-अ | ८९० | १०७ | ८२ | १ |
| गट-ब | ३०९३ | २२२ | १९६ | १९ |
| गट-क | ७१८२ | ५१३ | ३८२ | ५७ |
| गट-ड | ३०१६ | २१८ | १९८ | ३२ |
| | **१४१८१** | **१०६०** | **८५८** | **१०९** |

अधिसंख्य पदावर १०९ जणांना वर्ग केल्यानंतर ती पदे रिक्त दाखवायला पाहिजे होती. पण केवळ ८० पदे रिक्त दाखविण्यात आली आहेत. उपमुख्यमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे, मंत्री शिवेंद्रराजे भोसले (सार्वजनिक उपक्रम वगळून), राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी न्याय देऊन अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची विशेष पदभरती मोहीम राबवण्यात यावी.

**– मारोती खामकर उपाध्यक्ष, ट्रायबल फोरम पुणे विभाग**

## तळीरामांची उतरणार! महाराष्ट्रात दारू महागणार?
## महसूल वाढीसाठी सरकार कर वाढवण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

राज्याचा महसूल वाढवण्यासाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. महसूल वाढीसाठी दारुवरील कर वाढण्याची शक्यता आहे. दारू विक्रीस चाप लावत सरकार महसूल वाढवण्याचा प्रयत्न करणार आहे. गृहनिर्माण विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणअयात आली आहे. त्याबाबत शासन निर्णय देखील जारी करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत महसूल वाढीसाठी सरकार प्रयत्न करणार आहे. यासाठी सरकारकडून पाच सदस्यीय समितीला अभ्यास करण्याच्या सूचना दिल्या आहे. ही समिती मद्य निर्मिती धोरण, अनुज्ञप्ती प्रकार, उत्पादन शुल्क आणि कर संकलन वाढीचा अभ्यास करणार आहे. चांगल्या पद्धती आणि धोरणांचा अभ्यास करण्यास समितीला २ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

## संपादकीय ......

# झटपट श्रीमंत नाद; लाखो गुंतवणूकदारांना गंडा

*दादर येथील शिवाजी मंदिर परिसरात टोरेस कंपनीच्या नावाखाली उघड झालेल्या आर्थिक घोटाळ्याने सर्वसामान्य, मध्यमवर्गीय नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. दर आठवड्याला ११ टक्के व्याजदर परतावा देण्याचे आमिष दाखवून 'टोरेस' नावाच्या कंपनीने ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून घेतली. आधी सोने, हिऱ्याचे दागिने विकण्यापासून सुरुवात केलेल्या या कंपनीने गुंतवणुकीच्या माध्यमातून बक्कळ पैसा उभा केला. सुरुवातीच्या काळात सांगितल्याप्रमाणे आठवड्याला व्याजदर परतावा दिला गेला. त्यातून हजारो गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला. पण मागील आठवड्यात अचानक या कंपनीच्या सर्व शाखांना टाळे लागल्याचे बघून गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले. या शाखांच्या बाहेर हवालदिल ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. 'टोरेस'च्या नावाखाली मुंबई, ठाणे व आसपासच्या भागात ज्या शाखा सुरू करण्यात आल्या होत्या, त्यातील जवळपास सव्वालाख ग्राहकांची फसवणूक झाल्याची बाब पोलीस तपासातून पुढे येत आहे. टोरेस कंपनीच्या नावावर ग्राहकांची फसवणूक करणारा फंडा हा काही नवा प्रकार नाही. मुंबईत दोन महिन्यांत पैसे दुप्पट करून देतो, असे सांगणाऱ्या शेरेकर सारख्या अनेक खासगी कंपनीचा वन टू फॉरचा प्रकार गेल्या १५ ते २० वर्षांत मुंबईकरांनी अनुभवला आहे. पण त्यातून काही शहाणपण घेताना कोणी दिसत नाही. म्हणूनच असे प्रकार घडत असावेत.टोरेस कंपनीत गुंतवणूक करणाऱ्यांना अवघ्या ४ हजार रुपयांपासून गुंतवणूक करता येत होती. ही कंपनी रविवारी पैसे गुंतवल्यास सोमवार ते शुक्रवारदरम्यान त्याचा परतावा देत असे. सहा लाखांपर्यंतच्या गुंतवणुकीवर कंपनीकडून ६ टक्के व्याज देत होती. तर सहा लाखांपेक्षा जास्त गुंतवणूक केल्यास गुंतवणूकदारांना ११ टक्के व्याज मिळत होते. सुरुवातीच्या काळात टोरेस कंपनीने उच्चभ्रू इमारतीत घरे, गाड्या आणि दागिने असा आकर्षक परतावा काही ग्राहकांना दिला. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास बसला. मुंबईत गुंतवणुकीवर घसघशीत रिटर्न्स देणाऱ्या टोरेस कंपनीच्या बिझनेस मॉडेलची सातत्याने चर्चा होत होती. यानंतर अनेकांनी डोळे झाकून लाखो रुपये टोरेस कंपनीत गुंतवले. मात्र टोरेस कंपनीने आपला गाशा आता गुंडाळला आहे.गुंतवणूकदारांना स्वत:च्या घामाची मूळ रक्कम पुन्हा मिळविण्यासाठी कोर्टाच्या आदेशाची प्रतीक्षा करावी लागणार आहे; परंतु अशा आर्थिक घोटाळ्याला जसे लोभी गुंतवणूकदार जबाबदार आहेत, हे आपण मान्य करायला हरकत नाही; परंतु असे घोटाळे रोखण्यासाठी पोलीस प्रशासनापासून शासकीय यंत्रणा सुस्त आहेत, असे नाही का वाटत? बँकांनीही किती व्याजदर द्यावे, याचे निकष रिझर्व्ह बँक ठरवते. त्यामुळे आठवड्याला, महिन्याला व्याजदर देणारी कंपनी आपल्या परिसरात कार्यरत असेल तर स्थानिक पोलिसांनी त्याकडे लक्ष द्यायला नको का? तरुणांनी एकत्र येऊन नवा व्यवसाय सुरू करायचा म्हटला तर, त्यासाठी लागणाऱ्या परवानगीसाठी अनेक कष्ट सहन करावे लागतात. तर मग, असे गैरप्रकार घडत असतील तर रोखण्यासाठी सरकारी बाबूंनी स्वतंत्र यंत्रणा उभारायला नको का? टोरेस कंपनीच्या गुंतवणूकदारांवर पश्चात्तापाची वेळ आली आहे. आम्हाला व्याज नको. पण आम्ही गुंतवलेले पैसे तेवढे परत करा, या मागणीसाठी त्यांचा आता संघर्ष सुरू झाला आहे.*

# भागवत सप्ताह व कीर्तनाच्या माध्यमातून सुसंस्कृत पिढी निर्माण होते-माजी आ. यशोमती ठाकूर

## खा.वानखडे,यशोमती ठाकूर यांची भागवत सप्ताहाला भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नांदगाव पेठ -**

संत श्री काशिनाथ महाराज विश्वस्त मंडळाच्या वतीने तसेच गावकऱ्यांच्या वतीने पुण्यतिथी महोत्सवाचे केलेले उत्कृष्ट अयोजन कौतुकास्पद आहे. हा उत्सव गावासाठी मोठी देणं आहे. नववर्षाच्या पर्वावर होणाऱ्या संत काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवात भागवत सप्ताहाच्या व कीर्तनाच्या माध्यमातून आजच्या पिढीवर उत्तम संस्कार या धार्मिक कार्यक्रमामुळे होत असून यामुळे एक चांगली पिढी निर्माण करण्याचे श्रेय या विश्वस्त मंडळाला जात असल्याची भावना माजी आ.यशोमती ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केली.संत काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्य आयोजित भागवत सप्ताहाला भेट देतांना यशोमती ठाकूर भविकांशी संवाद साधत होत्या. संत श्री.काशीनाथ महाराज यांचा १९ व्या पुण्यतिथी महोत्सव काशिनाथ धाम नांदगाव पेठ येथे मोठ्या उत्साहात पार पडत असून याठिकाणी विविध मान्यवर मंडळी व लोकप्रतिनिधी भेटी देत आहेत.बुधवारी खा. बळवंत वानखडे व माजी आ. यशोमती ठाकूर यांनी संत काशिनाथ महाराज यांच्या समाधी मंदिरात जाऊन संत काशिनाथ महाराज यांचे दर्शन घेतले व भागवत सप्ताहाला भेट दिली. यावेळी संस्थानच्या वतीने खा. वानखडे व यशोमती ठाकूर यांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. हभप सोपान महाराज काळबांडे यांच्या सुमधुर वाणीतील कथा श्रवणाचा आस्वाद घेतल्यानंतर यशोमती ठाकूर यांनी उपस्थित भविकांशी संवाद साधला.संत श्री काशिनाथ महाराज विश्वस्त संस्थानचे पदाधिकारी शिवराजसिंह राठोड, विपुल पालिवाल, संदीप यावले, रुपेश पोटफोडे, मोनू राठोड,मनीष दुधे तसेच अन्य पदाधिकाऱ्यांच्या हस्ते खा. बळवंत वानखडे व यशोमती ठाकूर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच कविता डांगे, विनोद डांगे, राजेश बोडखे, बाळासाहेब देशमुख, बलविर चव्हाण, बाल्या दलाल,विनोद रंधवे,विजय राऊत यावेळी पंकज परिहार,संतोष गडेकार,प्रशांत इंगोले,अक्षय दारोकर,संदीप यावले,विपुल पालीवाल,दिनेश चौधरी,प्रवीण कापडे,जीवन दलाल,रंगराव गुर्जर,गनेश सोनोने,उदय चंदेल,शरदभगत,सुमीत सावरकर,सुरज ईखार, गौरव राठोड,अनिल हिवे आदी उपस्थित होते.



# विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ च्या काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल

## विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ च्या लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत, परंतु काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आले आहेत. यामध्ये बी.व्होक. सेमि.-१ (नवीन), बी. फार्म. सेमि.-१ (सी.बी.एस.एस.), एम.फार्म. सेमि.-१ (सी.बी.एस.एस.), बी.एस्सी. सेमि.-१ (एन.ई.पी.), पी.जी. डिप्लोमा इन सायबर सेक्युरिटी सेमि.-१ (सी.बी.सी.एस.) आणि बी.ई. सेमि.-५ (सी.बी.सी.एस.) या परीक्षांचा समावेश आहे.

यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना कळवायचे आहे. तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे.

अधिक माहितीकरीता त्यांचेशी ९८५००४२३५७ या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# टोमॅटोवरील मावा, पांढरी माशी या किडीचे नियंत्रण करण्यासाठी करा 'हे' उपाय




कृषी विशेष

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

शेतकरी मोठ्या प्रमाणात टोमॅटो पिकाची शेती करतात. टोमॅटो पिकाचे व्यवस्थापन करत असताना या पिकावर पांढरी माशी, मावा, फुलकिडे, लाल कोळी आधीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो.ज्याचे नियंत्रण करण्यासाठी परिस्थितीनुसार उत्पादकाला मोठ्या प्रमाणात आर्थिक भारदेखील सोसावा लागतो. याच अनुषंगाने आज आपण बघणार आहोत टोमॅटो पिकावरील पांढरी माशी, मावा, फुलकिडे, लाल कोळींचे नियंत्रण कसे करावे.

**एकात्मिक व्यवस्थापन**

रोपाची लागवड करतेवेळी इमिडाक्लोप्रीड १७.८ एसएल हे कीटकनाशक ३ मिली / १० लिटर पाण्यात मिसळून या द्रावणात रोपाच्या मुळा बुडवून लागवड करावी. रोपाची लागवड झाल्या नंतर ८ ते १० दिवसानी क्लोरँनट्रानीलीप्रोल ८.८ % + थायमिथॉक्झाम १८.५% एससी ५०० मिली प्रति हेक्टरी आळवणी करावी.

झाडातील अंतर योग्य असावे.

शिफारशीनुसार खताचा वापर करावा. नत्रयुक्त खतांचा अतिरिक्त वापर टाळावा.

प्रादुर्भावग्रस्त फळे, पाने, फांद्या तोडून नष्ट करावी.

विषाणूजन्य रोगग्रस्त झाडे काढून नष्ट करावीत.

| कीड | कीटकनाशक | मात्रा / १० लि.पाणी |
|---|---|---|
| पांढरी माशी, मावा, फुलकिडे | थायमिथॉक्झाम १२.६ % + लॅमडा साहॅलोथ्रीन ९.५% झेडसी | २.५ मिली |
| | स्पायरोमेसीफेन २२.५ एससी | १२.२ मिली |
| | थायमिथॉक्झाम २५ डब्ल्युजी | ४ ग्रॅम |
| लाल कोळी | प्रोप्रागाइट १० % + बायफेंथ्रिन ५ % एसइ | २२ मिली |
| | स्पायरोमेसीफेन २२.९ एससी | १२.२ मिली |





## रोज सकाळी या पद्धतीने खा पपई, सुधारेल डोळ्यांचे आरोग्य

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

पपई पोषकतत्वांनी भरपूर असे फळ आहे. पपईचे आरोग्यास अनेक फायदे होतात. तसेच रिकाम्या पोटी पपई खाणेही पाचन, एनर्जी तसेच संपूर्ण आरोग्यासाठी चांगले असते.

पपईमध्ये पपेन नावाचे नॅचरल एन्झाईम असते जे प्रोटीन तोडण्यास आणि त्याचे शोषण करण्यास मदत करते. यात फायबर आणि पाणी बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करण्यास मदत करतात. तसेच पाचनक्रिया सुरळीत राखण्यास मदत करतात.



पपईमध्ये मोठ्या प्रमाणात व्हिटामिन सी असते ज्यामुळे इम्युन सिस्टीम मजबूत होते. तसेच दररोज पपई खाल्ल्याने शरीरातील व्हिटामिन सीची कमतरता भरून निघते. तसेच सर्दी-खोकल्याचा त्रासही होत नाही.

वजन कमी करण्यासाठी पपई जेवणाच्या २ तास आधी खाल्ला पाहिजे. यावेळेस पचनक्रिया ॲक्टिव्ह असते. यामुळे वजन कमी करण्यास मदत मिळते. पपईमध्ये अँटीऑक्सिडंट्स, व्हिटामिन ए आणि व्हिटामिन ई असते जे फ्री रॅडिकल्सपासून बचाव करण्यास मदत करतात. तसेच स्किन डॅमेज होण्यापासूनही वाचते. पपई दररोज खाल्ल्याने स्किनला ग्लो येतो तसेच मुरूमांची संख्याही कमी होते. वय वाढण्याची प्रक्रियाही मंदावते.

हृदयाच्या आरोग्यासाठी पपई अतिशय फायदेशीर आहे. यात पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. तसेच ब्लड प्रेशर नियंत्रित करण्यास आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. यात अँटी इन्फ्लामेंटरी गुणही असतात.

पपईचा ग्लायसेमिक इंडेक्स फार कमी असतो त्यामुळे हे डायबिटीजच्या रुग्णांसाठी अतिशय फायदेशीर आहे. यातील फायबर ब्लड शुगर कंट्रोल करण्यास मदत करतात.

पपईमध्ये व्हिटामिन ए आणि बीटा कॅरोटिन असते जे डोळ्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात. यामुळे रात्रीची दृष्टी सुधारण्यातही मदत होते. लिव्हर आणि किडनीसाठीही पपई अतिशय फायदेशीर आहे. यातील फायबर शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करतात.

# राज्य वायय पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती,**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वायय पुरस्कार योजना राबविण्यात येते. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वायय पुरस्कार या योजनेंतर्गत निवडी अंती सन २०२४ चे राज्य वायय पुरस्कार प्रदान करण्यासाठी दि. १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत प्रकाशित झालेल्या प्रथम आवृत्ती पुस्तकांसाठी दि.१ जानेवारी, २०२५ ते ३१ जानेवारी, २०२५ या विहित कालावधीत प्रवेशिका मागविण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर प्रवेशिकेच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे उपलब्ध आहेत. दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ जानेवारी, २०२५ या विहित कालावधीत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रवेशिका व पुस्तके खास दूतामार्फत किंवा टपालाने दि. १० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत , दुसरा मजला ,सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ या कार्यालयात पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे. आपल्याकडील प्रवेशिका दि. १० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत या कार्यालयाकडे पाठविण्यास संबंधितांना सूचना द्याव्यात. त्यानंतर आलेल्या प्रवेशिका स्वीकारण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे .

# आगामी शंभर दिवसात पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांना प्राधान्य द्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई** राज्यातील मृद व जलसंधारणतंर्गत माथा ते पायथा तत्त्वावर पाणलोटाचा विकास करावा तसेच जलयुक्त शिवार अभियान ३.०, तलाव दुरस्ती योजना यासह विभागातंर्गत राबविण्यात येणा-या नाविन्यपूर्ण उपक्रमातंर्गत, आगामी शंभर दिवसात पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.

मंत्रालयात येथे मृद व जलसंधारण विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनीक, मुख्य सचिव (वित्त) विभाग ओ.पी.गुप्ता,मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा,प्रधान सचिव अश्विनी भिडे,सचिव डॉ श्रीकर परदेशी,मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील यावेळी उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की,प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना,जलयुक्त शिवार अभियान,गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना,आदर्शगाव योजना,नवीन जलसंधारण प्रकल्पांची उभारणी व प्रगतीपथावरील प्रकल्प,पूर्ण झालेले प्रकल्पांचे परीक्षण व दुरस्ती,माजी मालगुजरी तलावांचे पुनरूज्जीवन व दुरस्ती कार्यक्रम या योजनांमध्ये प्रत्यक्ष सुरू असलेल्या कामांना गती द्या.भविष्यकालीन योजनांचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करून त्याला मान्यता घ्यावी.

राज्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यावर भर देवून त्यासाठी योग्य ते नियोजन करा,विभागातील प्रलंबित कामांचा जलद निपटारा करा,पदभरती, विभागातील उपलब्ध मनुष्यबळाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी प्रशिक्षणांचे आयोजन करा असे निर्देश त्यांनी दिले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक


शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५

शहर/ग्रामिण


## बारावीच्या विद्यार्थ्यांना आजपासून ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता बारावीची परीक्षा येत्या ११ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. या परीक्षेसाठी आवश्यक प्रवेशपत्रे ऑनलाइन पद्धतीने शुक्रवारपासून (दि. १०) उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांना मंडळाच्या संकेतस्थळावरून ही प्रवेशपत्र डाऊनलोड करता येणार आहेत. मात्र, या प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर प्राचार्यांची सही व शिक्का घेणे आवश्यक आहे.राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, यंदाची बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार आहे. पुरवणी परीक्षा लवकर घेऊन त्याचा निकाल लवकर जाहीर करण्याच्या उद्देशाने, दहावी आणि बारावीची परीक्षा यंदा ८ ते १० दिवस आधी घेण्यात येत आहे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे शिक्षण मंडळाच्या www.mahahsscboard .in या संकेतस्थळावर 'डमिट कार्ड' या लिंकद्वारे डाउनलोड करता येतील. ज्या



आवेदनपत्रांना पेड असे स्टेट्स प्राप्त झाले आहे. त्यांचीच प्रवेशपत्रे पेड स्टेटस डमिट कार्ड' या पर्यायाद्वारे उपलब्ध होतील. एखाद्या विद्यार्थ्याचे प्रवेशपत्र गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी पुनश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत (डुप्लिकेट) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र द्यायचे आहे, असे राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी कळविले आहे.

## प्राणीसंग्रहालयातील वाघांच्या 'मटण पार्टी'वर बंदी


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० नागपूर :**

गोरेवाडा बचाव केंद्रात काही दिवसांपूर्वी तीन वाघ आणि एका बिबट्याच्या अचानक झालेल मृत्यूने खळबळ उडाली. त्यांच्या अवयवाच्या नमुन्याची तपासणी केल्यानंतर 'एच-५एन-१' या विषाणूमुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. गोरेवाडा बचाव व उपचार केंद्रासह भोपाळच्या संस्थेनेही त्यावर शिक्कामोर्तब केले. दरम्यान, प्राणीसंग्रहालयाने थेट वाघांच्या 'मटण पार्टी'वरच बंदी आणली आहे.

भारतात पहिल्यांदाच या विषाणूची लागण वाघांना होऊन त्यामुळे वाघ मृत्यूमुखी पडल्याने हे कोडे अजूनही सुटलेले नाही. आजतागायत वाघांना या विषाणूची लागण झाल्याचे ऐकिवात नव्हती किंवा तशी नोंदही नाही. त्यामुळे वाघ आणि बिबट्याला या विषाणूची लागण झालीच कशी, याचा स्पष्ट खुलासा अजूनही कुणालाच करता आलेला नाही. गोरेवाडा बचाव केंद्रात आणलेले हे तिनही वाघ ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या लगतच्या क्षेत्रातून आणले होते. बाहेर असणारे हे वाघ गावातील पाळीव जनावरे, कोंबड्या तसेच इतर वन्यप्राण्यांची शिकार करतात. या वाघांनी आधीच या विषाणूची लागण झालेल्या कोंबड्या खाल्या आणि त्यामुळेच त्यांना या विषाणूची लागण झाली असावी, असाही एक अंदाज काही लोक जुळवून पाहात आहेत.

मात्र, वनमंत्री गणेश नाईक यांनी त्यांच्या चंद्रपूर दौऱ्यादरम्यान गोरेवाडा बचाव केंद्राच्या अधिकाऱ्यांना बोलावले आणि कोंबडीच्या मटणातून त्यांना ही लागण झाली का, याची सत्यता तपासली जाईल असे सांगितले. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी




देखील प्राणीसंग्रहालयांना खाद्य तपासून घेण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाच्या सखोल चौकशीनंतर काय निष्पन्न होईल ते पाहावे लागेल, असे वनमंत्री म्हणाले. दरम्यान, या प्रकरणाची दखल वनमंत्र्यांनी सुद्धा घेतल्याने प्राणीसंग्रहालयातील प्राण्यांना कोंबडीचे मांस द्यावे की नाही, या विचारात ते पडले आहेत. कारण प्राणीसंग्रहालयात वेगवेगळे प्राणी आहेत आणि या प्रत्येक प्राण्याचे खाद्य वेगळे आहेत. यात कोंबडीचे मांस, बैलाचे मांस यासह खेकडे, मासे, झिंगे, अंडी दिली जातात. वाघांना कोंबडीचे मांस सहजासहजी दिले जात नाही. मात्र, तरीही सत्यता तपासण्याचे निर्देश दिल्यामुळे प्राणीसंग्रहालयात कोंबडीचे मांस आणावे की नाही या विचारात ते पडले आहेत. भोपाळ येथील पशुवैद्यकीय प्रयोगशाळेने दिलेल्या अहवालानंतर इतर प्राण्यांना लागण होऊ नये, त्यासाठी प्राण्यांना विलगीकरणात ठेवण्यात आले आहे.

## भाजीबाजार परिसरात भीषण आग, नेत्रालयाचे पाच लाखांचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** शहरातील गजबजलेल्या भाजीबाजार परिसरात बंद मराठे नेत्रालयाला लागलेल्या भीषण आगीत साडेचार ते पाच लाखांचे नुकसान झाले. बुधवारी (ता. नऊ) रात्री दहाच्या सुमारास ही घटना घडली.अचानक आग लागून हॉस्पिटल बाहेर धूर दिसताच आसपासच्या रहिवाशांची तारांबळ उडाली. सदर नेत्रालयाच्या आसपास इतर व्यापारी प्रतिष्ठाने होती. आगीचे लोट बाहेर दिसताच नागरिकांनी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिली. एकापाठोपाठ एक,असे तीन बंब आगीच्या ठिकाणी पोहोचले. आगीत आतील फर्निचर, टेबल, खुर्ची, पंखा, डोळे तपासण्याची अत्याधुनिक मशीन खाक झाली. आत



झालेल्या शॉकसर्किटमुळे आग लागल्याची माहिती अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. अर्ध्या तासामध्ये नेत्रालयाला लागलेली आग अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी आसपासच्या विझविल्यामुळे रहिवासी व व्यापाऱ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. अग्निशमन दलाचे केंद्रप्रमुख सय्यद अनवर, इमरान खान शेख सलीम, इमरान खान शहाबाजुद्दीन आदी अग्निशमन दलाचे कर्मचारी आगीच्या ठिकाणी दाखल झाले होते.

## राज्याच्या ड्रॉप बॉक्समध्ये ९ लाखांहून अधिक विद्यार्थी

## 'शाळाबाह्य'ची संख्या लाखात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०मुंबई –** दरवर्षी शिक्षण विभागाकडून शाळांमध्येशाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवली जाते, मात्र त्यात समोर येणारे प्रमाण हे अगदी नगण्य असते. या उलट शिक्षण विभागाच्याच स्टुडंट पोर्टलवर नोंद असणारी शाळाबाह्य मुलांची आकडेवारी लाखांत असल्याचे समोर आले आहे. तर ड्रॉप बॉक्समध्ये तब्बल ९ लाख ७५ हजार आहेत. सर्वाधिक शाळाबाह्य मुले ठाणे आणि पुण्यात आहेत.

### सर्वाधिक ठाण्यात



निरंतर शिक्षण पद्धतीमध्ये एका वर्गातील विद्यार्थी हे दुसऱ्या वर्गात जाताना पटसंख्या शक्यतो वाढायला हवी किंवा तीच राहायला हवी, परंतु ती कमी असल्यास, बाहेर पडलेले विद्यार्थी नेमके कुठे गेले याचा शोध घेण्यासाठी शिक्षण विभागाकडून मिशन ड्रॉप बॉक्स ही मोहीम राबवली जाते.

नुकत्याच शिक्षण विभागाकडून शाळा आणि मुख्याध्यापकांना ड्रॉप बॉक्स शून्यावर आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, ड्रॉप बॉक्स शून्यावर आणण्यात बऱ्याच अडचणी असून, ते प्रत्यक्षात शक्य नसल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. यासाठी शिक्षण विभागाकडून नोंदीसाठी पर्याय सूचवणे आवश्यक असल्याचे मत यातील तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

**काय आहे 'ड्रॉप बॉक्स'?**

इयत्ता १ ते १२ वी पर्यंतच्या मागील वर्षाच्या विद्यार्थ्यांची पटसंख्या आणि उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या व यंदा पुढील वर्गातील विद्यार्थ्यांची पटसंख्या काढली जाते.

मागील वर्षी जेवढे विद्यार्थी उत्तीर्ण झाले तेवढ्याच विद्यार्थ्यांची पटसंख्या पुढील वर्गात असणे आवश्यक आहे. मात्र, ती मागील वर्षाच्या कमी आढळल्यास कोणत्या कारणामुळे या विद्यार्थ्यांची नोंद होऊ शकली नाही, याची माहिती शिक्षण विभागाला असणे अपेक्षित आहे.

विद्यार्थ्यांनी खासगी शाळांमध्ये प्रवेश घेतला किंवा शिक्षण सोडले, दैनंदिन शाळेऐवजी इतर माध्यमातून शिक्षण घेतले किंवा त्यांचे दुसऱ्या जिल्ह्यात स्थलांतरण झाले, याचा शोध घेण्याच्या मोहिमेला 'मिशन ड्रॉप बॉक्स' हे नाव देण्यात आले आहे.

## जिल्ह्यातील ६३ सेवा संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेला वेग

## ७ जानेवारीपासून मतदान यादी तयार करण्याला सुरूवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणूकीवरील स्थगनादेश हटविण्यात आल्याने आता जिल्ह्यात लवकर सहकार क्षेत्रातील संस्थेच्या निवडणुकीचा मार्ग सुकर झाला आहे. त्यासाठी जिल्ह्यातील ६३ सेवा सोसायटीच्या मतदार याद्या तयार करण्याच्या प्रक्रियेला ७ जानेवारीपासून सुरूवात करण्यात आली आहे. जिल्ह्यातील वलगाव, नांदगाव पेठ, दर्यापूर, मोझरी, ब्राम्हणवाडा थडी, पूर्णानगर, राजुराबाजार या मोठ्या सेवा सहकारी सोसायट्यांसह भिलोना, वासनी, बंबला, बेनोडा, तोंडगाव, हनवंतखेडा, करजगाव, जालनापूर, बोराळा, निंभा, जळका हिरापुर, कोल्हा, निभारी, येसूर्णा, रोशनखेंडा, जामगाव, खानापूर, अंबाडा, नया अकोला या सेवा सहकारी सोसायटीच्या मतदारांची यादी तयार करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. यासह चांदूरबाजार तालुक्यातील औद्योगिक सहकारी संस्था, धन्वंतरी रुग्णालय सहकारी संस्था, अष्टविनायक नागरी सहकारी पत संस्था, दुर्गा बांबू उत्पादक औद्योगिक सहकारी संस्थाप्रहार कृषी संस्था, महात्मा फुले बिगरशेती पत संस्था, विभागीय सेवायोजन कर्मचारी पत संस्था, अमरावती खंडविकास औद्योगिक सहकारी संस्था, चांदूररेल्वे खंडविकास औद्योगिक सहकारी संस्था, तिवसा तालुका बहुउद्देशीय औद्योगिक कारागिर संस्था या संस्थेच्या निवडणुकाही होणार आहेत. निवडणुकीसाठी मतदान यादी तयार करण्याचे काम प्रगती पथावर असून लवकरच याद्या तयार होतील. त्यानंतर मतदार याद्यांवर आक्षेप व सूचना मागविल्या जातील आणि अंतिम यादी प्रकाशीत केल्यानंतरच निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार आहे.

> मतदान यादी तयार करण्याच्या प्रक्रियेने गती घेतली आहे. सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीला डिसेंबर २०२३ पर्यंत स्थगनादेश देण्यात आला होता. दरम्यान शासन आदेशानुसार स्थगिती हटवून जिल्ह्यातील ६३ सोसायटीच्या निवडणुकीच्या कार्यक्रमाला मान्यता दिली जाईल.
>
> **शंकर कुंभार**,जिल्हा उपनिबंधक, अमरावती

## शिरजगाव ते मोझरी रस्त्याने दिसला बिबट

## नागरिकांमध्ये बिबट्याची दहशत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० शिरजगाव मो.** तिवसा तालुक्यातील मोझरी ते शिरजगाव रस्त्याने मोझरी शेतशिवारलगत बिबट्या दिसल्याची चर्चा.दि.८जानेवारी रात्री ८ते ९ दरम्यान अंदाजे अडीच फूट उंच असलेला बिबट्या दिसल्याची चर्चा पसरल्याने शिरजगाव ते मोझरी मार्गाने रोज छोटेमोठे व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.धोत्रा, माळेगाव, सालोरा,शिरजगाव,शंदोळा येथील ग्रामस्थांना तालुक्याच्या ठिकाणी याच मार्गाने नेहमीच ये-जा करावे लागते त्यामुळे यापूर्वी देखील अनेकांच्या नजरेत बिबटया दिसल्याची चर्चा आहे.दि.८जानेवारीला रात्री ८ ते ९ च्या दरम्यान मोझरी



वरून शिरजगाव येथे जात असत्यांना चारचाकी गाडीत असलेल्यांना नागरिकांना पुन्हा बिबट्या दिसला असूनपरिसरात भीती निर्माण झाली आहे. सध्या गहू,हरभरा,कांदा सारख्या पिकांना ओलित करण्यासाठी शेतकरी रात्रीबेरात्री शेतात जात असतात. आणि अशातच बिबट्या असल्याच्या चर्चेने शेतकऱ्यांना ओलित कसे करायचे असा प्रश्न पडला आहे.मोझरी येथील सरपंच सुरेंद्र भिवगडे यांनी वनविभागाला माहिती दिली असता.वनविभागाचे एस. डब्लू. घोरमाडे (वनपाल)जी.बी.जांभे (वनरक्षक)ममता डायरे (वनरक्षक) पायल अंबाडकर,मनोहर वणवे बिबट दिसलेल्या आसपासच्या सर्व ठिकाणी पाहणी केली असता कोणतेही बिबट असल्याची पाऊलखुणा किंवा चिन्ह आढळून आले नाही

## अखिल भारतीय आदिवासी हलबा/ हलबी समाजाचे रविवारी (१२ जानेवारीला) भव्य मेळाव्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** अखिल भारतीय आदिवासी हलबा/हलबी समाजाचे भव्य आदिवासी जनजागृती मेळाव्याचे आयोजन गडचिरोली/चिमूरचे खासदार डॉ. नामदेवराव किरसान यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सौ. सावित्रीबाई यादव सभागृह, संताबाई यादव नगर, चांदूर रेल्वे येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. या मेळाव्याचे आयोजन आदिवासी हलबा/हलबी समाज संघटना विभागीय शाखा अमरावतीच्या वतीने करण्यात आले असून सर्व समाजबांधवांनी या मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेचे अध्यक्ष हेमराज राऊत व सदस्यांनी केले आहे.

या जनजागृती मेळाव्यात विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली सर्व अकरा जिल्ह्यातील समाजबांधव यांच्यासह मध्यप्रदेश व छत्तीसगड येथील आदिवासी समाज बांधव एकत्रपणे उपस्थित राहणार आहे.या मेळाव्याला आदिवासी हलबा/हलबी कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष यादवराव भोयर अध्यक्ष म्हणून तर माजी शिक्षण मंत्री वसंतराव पुरके उदघाटक म्हणून उपस्थित राहणार आहे. आदिवासी विकास विभागाच्या उपायुक्त श्रीमती जागृती कुमरे, नागपूर महासंघाचे कार्याध्यक्ष माधवराव गावड, छत्तीसगड संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राधेश्यामजी नाईक, आदिवासी एकता परिषद, नवी दिल्लीचे बी. एस. रावटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याला तज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांकडून महत्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्या येणार आहे. त्यात डॉ. मनिष वाडीवे हे स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन करणार आहे. प्रा. अनिता धुर्वे यांच्याव्दारे नवीन शिक्षण पध्दती आणि विद्यार्थ्यांच्या अडचणी याविषयी, महेन्द्र कोठेवार व अजय कोठेवार यांच्याव्दारे अंधश्रध्दा व समाज एकत्रिकरण या विषयासंबंधी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचे उद्घाटन व दिप प्रज्वलन, सकाळी ११ ते ३ वाजेपर्यत प्रमुख अतिथींचे स्वागत व मार्गदर्शनपर भाषणे, दुपारी ३ ते ४ या वेळेत भोजन व त्यानंतर ४ ते सायं. ६.०० गुणवंत विद्यार्थी विद्यार्थीनींचा सत्कार व सांस्कृतिक कार्यक्रमाने समारोप याप्रमाणे कार्यक्रमावली राहणार आहे.

आदिवासी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी समाजाची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व औद्योगिक प्रगती होणे आवश्यक आहे आणि ती काळाची गरज सुध्दा आहे. या महत्वपूर्ण घटकांबाबत समाजातील लोकांमध्ये व्यापक प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे. या संदर्भात मेळाव्यात तज्ज्ञ व समाजिक कार्यकर्ते मार्गदर्शन करणार आहेत. सद्यस्थितीत गैरआदिवासी लोकांनी खोट्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रां च्या आधारे खऱ्या आदिवासी समाजाचे शासकीय योजनांचे लाभ घेतले असून शासकीय नोकऱ्या सुध्दा बळकावल्या आहेत. यामुळे अनेक आदिवासी शेतकरी, शेतमजूर गोरगरीब लोक शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित आहेत. खरा आदिवासी समाजबांधव विकासाच्या प्रवाहापासून कोसो दूर जात आहे.खऱ्या आदिवासी गोरगरीब जनतेचा सर्वांगिण विकास साधायचा असेल तर आदिवासी समाजाला एकजूट होऊन आपली ताकद दाखववावी लागेल. तसेच आदिवासींना मिळत असलेल्या विविध शासकीय योजना, उपक्रम, शासनाचे धोरण, शैक्षणिक लाभ आदी संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी लागणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून चांदूर रेल्वे येथील सौ. सावित्रीबाई यादव सभागृह, संताबाई यादव नगर याठिकाणी भव्य आदिवासी हलबा/ हलबी समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास समाजातील सर्व बंधू भगिनींनी बहुसंख्येने आर्वजून उपस्थित राहावे, असे नम्र आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पत्रकार उमेश अलोणे यांचा पुणे येथे गौरव

## 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकारिता भूषण पुरस्कार' प्रदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**
अकोला येथील 'एबीपी माझा'चे प्रतिनिधी उमेश अलोणे यांचा मराठी पत्रकार दिनी पुण्यात गौरव करण्यात आला. 'महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या वतीने हा गौरव करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उमेश अलोणे यांना 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकारिता भूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी जेष्ठ समाजसेवक 'पद्मश्री' गिरीश प्रभुणे, 'एबीपी माझा'च्या कार्यकारी संपादिका सरिता कौशिक, सिने अभिनेते किरण माने, जेष्ठ पत्रकार सचिन जवळकोटे, आमदार अमित गोरखे, माजी आमदार विलास लांडे, शिवसेना

उपनेते इरफान सय्यद, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे नवे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, संघटक संजय भोकरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. पुण्यातील भोसरी येथील ग दि माडगूळकर नाट्यगृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमापूर्वी 'महाराष्ट्राच्या पत्रकारितेतीर वर्तमान दशा आणि दिशा' या विषयावर परिसंवाद झाला. ज्येष्ठ अभिनेते किरण माने यांनी या परिसंवादाचं संचलन केले. या परिसंवादात सरिता कौशिक, सचिन जवळकोटे, पद्मश्री गिरीश प्रभुणे, ज्येष्ठ वृत्त निवेदक पंकज इंगोले यांच्यासह इतर मान्यवर सहभागी होते. उमेश अलोणे यांनी सहकुटुंब हा पुरस्कार स्वीकारला.

# तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत दहीगाव शाळा जनरल चॅम्पियनचे मानकरी

## प्राथमिकमध्ये सातेफळ, माध्यमिकमध्ये दहीगाव, सांस्कृतिकमध्ये चांदूरवाडी अव्वल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०चांदूर रेल्वे**
तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सव तथा उल्हास मेळावा दिनांक ७ व ८ जानेवारी रोजी श्री मन्नालाल गुप्ता विद्यालय चांदूर रेल्वे येथे आयोजित करण्यात आला. या स्पर्धेत जि.प.पूर्व माध्यमिक शाळा दहीगाव धावडे हि शाळा जनरल चॅम्पियनची मानकरी ठरली. प्राथमिक शालेय गटात विद्यामंदिर पूर्व माध्यमिक शाळा सातेफळ, माध्यमिक गटात जि.प.पूर्व माध्यमिक शाळा दहीगाव धावडे तर सांस्कृतिक स्पर्धेत जि.प.पूर्व माध्यमिक शाळा चांदूरवाडी यांनी बाजी मारत चषकाचे मानकरी ठरले.

दोन दिवसीय क्रीडा स्पर्धेचा समारोपीय तथा बक्षीस वितरण सोहळा दिनांक ८ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता श्री मन्नालाल गुप्ता विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन कडू यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नायब तहसिलदार अनिल चवरे, माजी पं.स.सदस्या प्रिती तिजारे, गटशिक्षणाधिकारी संदीप




बोडखे, सहायक प्रशासन अधिकारी गजेंद्र पाटील, शिवाजी शिक्षण संस्था शाळा तपासनी अधिकारी मधुकर रोडे, माजी गटशिक्षणाधिकारी मुरलीधर राजनेकर, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सुधीर केने, प्रा.रवींद्र मेंढे, नामदेव मार्डीकर, मुख्याध्यापक उमेंद्र ढगे , विस्तार अधिकारी रवींद्र दिवाण, गटसमन्वयक मंगेश उल्हे, केंद्रप्रमुख राजेंद्र तामस्कर, राजेंद्र वानखडे, केशव राठोड, गणेश वासनकर, सुरेश दामले,श्रीमती सविता अ.देशमुख आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्राथमिक विभागातून कबड्डी (मुले), कबड्डी (मुली),खो-खो(मुले), लंगडी स्पर्धेत विद्यामंदिर पूर्व माध्यमिक शाळा सातेफळने बाजी मारली. खो-खो (मुली)स्पर्धेत जि.प.पूर्व माध्यमिक शाळा कळमगाव अजिंक्य ठरली. माध्यमिक गटात कबड्डी (मुले)- जि.प.पूर्व माध्यमिक शाळा कळमगाव, कबड्डी (मुली) जि.प.पूर्व माध्यमिक शाळा दहीगाव धावडे, खो-खो(मुले) जि.प.पूर्व माध्यमिक शाळा शिरजगाव कोरडे, खो-खो(मुली) जि.प.पूर्व माध्यमिक शाळा चांदूरवाडी, व्हॉलीबॉल (मुले)- जि.प.पूर्व माध्यमिक शाळा जावरा, व्हॉलीबॉल (मुली)- जि.प.पूर्व माध्यमिक शाळा दहीगाव धावडे, बॅटमिंटन (मुले) जि.प.पूर्व माध्यमिक शाळा चिरोडी, बॅटमिंटन दुहेरी (मुली) जि.प.पूर्व माध्यमिक शाळा चांदूरवाडी, बॅटमिंटन एकेरी (मुली) जि. प. उर्दू पूर्व माध्यमिक शाळा मांजरखेड क, टेनीक्वाइड दुहेरी (मुली) दुहेरी जि.प.पूर्व माध्यमिक शाळा चांदूरवाडी, टेनीक्वाइड एकेरी (मुली) जि.प.पूर्व माध्यमिक शाळा चांदूरवाडी शाळांनी अव्वल स्थान पटकावले. वैयक्तिक स्पर्धेतील धावणे,उंच उडी (मुली),लांब उडी (मुली) ,दोरीवरच्या उड्या स्पर्धेत विद्यामंदिर पूर्व माध्यमिक शाळा सातेफळ यांनी उंच उडी (मुले) व लांब उडी(मुले) स्पर्धेत जि.प.शाळा मालखेड व धावणे (मुली) स्पर्धेत जि.प. पूर्व माध्यमिक शाळा दहीगाव धावडे यांनी बाजी मारली.

# विद्यार्थ्यांचे यश आमच्यासाठी अभिमानास्पद- डॉ.नितीन धांडे

## आयपर च्या विद्यार्थ्यांचा सत्कार व कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**
विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे कोणत्याही क्षेत्रात विद्यार्थ्यांनी मिळविला नावलौकिक हा त्या संस्थेच्या मानाचा तुरा असतो अशा शब्दात विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांनी गौरवउद्गार काढले.नुकत्याच पार पडलेल्या स्व. माणिकराव घवळे स्मृति राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत वर्धा येथील औषध निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था ( आयपर ) कॉलेजच्या



विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचा सांघिक पुरस्कार पटकावल्याबद्दल त्यांचा विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीच्या वतीने सत्कार करण्यात आला.स्व.माणिकराव घवळे राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सांघिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. त्यांना आयोजकांच्या वतीने ११००० रुपये रोख, फिरता चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी नामांकित स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचा ठसा उमटविणे हे संस्थेसाठी देखील गौरवची बाब आहे.त्यामुळे त्यांचे कौतुक झालेच पाहिजे. विद्यार्थ्यांनी अशीच यशाची शिखर गाठावी अशा शब्दात डॉ. नितीन धांडे यांनी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, प्रा. डॉ. पूनमताई चौधरी, पकंज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र गंजीवाले यांनी अभिनंदन केले. वादविवाद स्पर्धेमध्ये श्रेया ठाकरे व राधा भावरकर या दोन विद्यार्थिनीचा संघ सहभागी झाला होता. सत्कार समारंभाला विजेत्या स्पर्धकासोबत आयोजक प्रफुल्ल घवळे,मयूर चौधरी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.सदर विध्यार्थांनीच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पारा १०.१ अंश सेल्सिअसपर्यंत घसरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती** –
शेकोटीजिल्ह्यात तापमानाचा पारा १०.१ अंश सेल्सिअसपर्यंत घसरला आहे. जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यात पश्चिम विदर्भातील तापमान कमी झाले. हुडहुडीमुळे नागरिक थरथरू लागले आहेत. जिल्ह्यात गुरूवारी (ता. नऊ) कमाल तापमान २८ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १०.१ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आलेले आहे.



मुले, ज्येष्ठ नागरिक गरम कपडे परिधान करण्यास पसंती देऊ लागले आहेत. त्यासोबतच शरीरात उष्णता निर्माण करण्यासाठी गरम पेय आणि खाद्यपदार्थावर जोर दिला जात आहे. श्री शिवाजी कृषी महाविद्यालयातील हवामानतज्ज्ञ प्राध्यापक अनिल बंड यांच्या माहितीनुसार, आणखी दोन दिवस हे वातावरण अशाच पद्धतीने कायम राहणार आहे. उत्तर भारतात बर्फवृष्टीच्या कारणामुळे थंड वारे वाहत आहेत. या आठवड्यात पारा घसरला. त्यामुळे सर्वत्र चहा आणि शरीरात उष्णता निर्माण करणाऱ्या पदार्थांच्या मागणीत वाढ झालेली आहे. सायंकाळी थंड वाऱ्यामुळे नागरिक आपापल्या घरात राहणे पसंत करीत आहेत. जिल्ह्यात ही थंडीची लाट आणखी

तीन दिवस राहणार असल्याचे हवामान तज्ञ प्राध्यापक अनिल बंड यांनी सांगितले.

शनिवार नंतर ढगाळ वातावरण पूर्णतः निघून गेल्यानंतर थंडी आणखी जाणवणार आहे. वाढत्या थंडीमुळे नागरिक शेकोटी पेटवून थंडीपासून बचाव करताना दिसत आहेत. मकर संक्रांतीनंतर हळूहळू तापमानात वाढ होईल, असा अंदाज वर्तविला जात आहे–

# सीबिलमुळे शेतकरी कर्जापासून वंचित

## रब्बी हंगामात केवळ तीस टक्के कर्ज वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**
रब्बी हंगामात सीबीलची अट घालत शेकडो शेतकऱ्यांना पीककर्जापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचा आरोप शेतकरी वर्गातून करण्यात आला आहे. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात निर्धारित उद्दिष्टांच्या ३० टक्के पीककर्ज वाटप होऊ शकले. ७४ हजार ७६० पात्र शेतकऱ्यांपैकी केवळ ८ हजार १६१ शेतकऱ्यांना कर्ज मिळू शकले आहे. ६६ हजार ५९९ शेतकऱ्यांपर्यंत कर्ज वितरण पोहचू शकलेले नाही. राष्ट्रीय बँकांनी सर्वाधिक ३६ टक्के वितरण ७ हजार ७११ शेतकऱ्यांना केले.

यंदाच्या रब्बी हंगामासाठी ७४ हजार७६० शेतकऱ्यांसाठी ५०० कोटी रुपये कर्ज वितरणाचे उद्दीष्ट जिल्हास्तरीय समितीने निर्धारित करून दिले



आहे. बहूतांश शेतकरी खरीप हंगामातच पीककर्ज घेतात. त्या तुलनेत रब्बीत ही संख्या कमी राहते. मात्र यंदा पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांपेक्षा अतिशय कमी शेतकऱ्यांना कर्ज वितरित झाले आहे. राष्ट्रीय बँकांसह खासगी व ग्रामीण बँका रब्बी हंगामात कर्ज वितरण करते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या हंगामात कर्ज वाटप करीत नसल्याने ३५ हजार शेतकरी वंचित राहिले आहेत. त्यांच्यासाठी या बँकेला ८० कोटींच्या कर्ज वितरणाचे उद्दीष्ट होते. राष्ट्रीय बँकांनी ३४ हजार ५५० पैकी ७७११ शेतकऱ्यांना तर खासगी बँकांनी ३७१० पैकी ४१५ व ग्रामीण बँकांनी १५०० पैकी केवळ ३५ शेतकऱ्यांना कर्ज वितरित केले आहे.कर्ज वितरणाची माहिती देण्यास अग्रणी बँकेकडून नकारघंटा वाजविली जाते. सहकार विभागालाही नियमित माहिती दिल्या जात नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी दम भरल्यानंतरही कर्ज, झिरणाची गती मंद ठेवण्यात येते. गुन्हे दाखल करण्याची वेळ अनेकदा जिल्हाधिकाऱ्यांवर आली आहे.

### रब्बी हंगामात दरवर्षीच कमी वितरण

रब्बी हंगामात दरवर्षीच कर्ज वितरणाचे प्रमाण अल्प राहिले आहे. गतवर्षी (२०२३-२४) ५०० कोटींचे उद्दीष्ट होते. त्यातुलनेत १८९.९२ कोटींचे कर्ज वितरण झाले होते. त्याची सरासरी ३८ टक्के होती. एकूण १४ हजार ६९४ शेतकऱ्यांना कर्ज वितरित झाले होते, तर यंदा एक ऑक्टोबरपासून ३१ डिसेंबरपर्यंत आठ हजार १६१ शेतकऱ्यांना १४७.५२ कोटींचे कर्ज वितरित झाले आहे. हे प्रमाण ३० टक्के इतके आहे.

# सावित्री माई फुलेच विद्येची देवता- मंदाकिनी निमकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती** – ६
सावित्री बाई फुले ज्योतीबा फुले यांनी धर्म मार्तंड लोकांची दगड, विट शेन खाऊन देखील शाळा काढून मुलींना शिक्षण देण्याचे काम केलं नसते तर आज आम्ही महिला चार भिंतीच्या आतच बंदिस्त राहिलो असतो,फुले दाम्पत्यांचे संपूर्ण संपूर्ण महिला वर्गाचे मानावे तेवढे उपकार कमी पाडतील असे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण समितीच्या अध्यक्षा मंदाकिनी निमकर यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्री माई व ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर



प्रकाश टाकणाऱ्या लघु नाटिका सादर केल्या,विद्यार्थ्यांनी फुले दाम्पत्याच्या जीवनावर प्रकाश टाकणारे भाषणे देखील केली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ जयंत पवार तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य मंगेश गोरडे, प्रा संजय शेंडे होते. कार्यक्रमाचे संचालन गजानन पोटदुखे यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षिका जयश्री आडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल इंगळे, अनिल मावसकर, मिलिंद बेलसरे,किसन चव्हाण,राजेश ढेवले,रजत खडसे यांनी परिश्रम घेतले.

# मुख्याध्यापकाच्या निलंबनाविरोधात शिक्षकांत संताप

## अडगांव येथील विषबाधा प्रकरण : बळीचा बकरा बनविल्याची भावना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती** मोर्शी तालुक्यातील अडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत काही दिवसांपूर्वी पोषण आहारातून विद्यार्थ्यांना झालेल्या विषबाधा प्रकरणात काल मुख्याध्यापकांवर निलंबनाची कारवाई प्रशासनाकडून कण्यात आली आहे. मात्र चोर सोडून सन्याशाला फाशी देण्याचा हा प्रकार असल्याचा सूर शिक्षकांमधून उमटत आहे.

मुख्याध्यापकांना निलंबित तर करण्यात आले, मात्र पुरवठाधारकांना अभय दिले जात असल्याचा आरोप शिक्षक संघटना करीत आहे. त्यामुळे येत्या काळात या कारवाईविरोधात आंदोलनसुद्धा छेडले जाऊ शकते.

मोर्शी पंचायत समिती अंतर्गत अडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत २८ डिसेंबर रोजी देण्यात आलेल्या पोषण आहारातून जवळपास ५६ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली होती. या प्रकरणानंतर चांगलीच खळबळ उडाली.याप्रकरणी गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या अहवालावरून शिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापक दिनेश भागवत यांना निलंबित करण्याचे आदेश दिलेत. या कारवाईनंतरशिक्षक मात्र कमालीचे संतापले आहेत.

ही कारवाई चुकीची असून आहारासाठी स्वतंत्र यंत्रणा करावी तसेच पुरवठादाराला सोडून मुख्याध्यापकांना कसे काय जबाबदार धरण्यात आले, असा प्रश्न अनेकांनी उपस्थित केला आहे.

### सोशल मीडिया बनले प्लॅटफार्म

मुख्याध्यापकांना निलंबित केल्यानंतर शिक्षकांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवरून नाराजीचा सूर उमटत आहे. अनेकांनी आंदोलन छेडण्याचे आवाहन केले आहे, तर काहींनी पुरवठाधारकांना यासाठी जबाबदार धरले आहे. पोषण आहारासाठी राज्यस्तरावर स्वतंत्र यंत्रणा उभारावी, यासाठी सरकारवर दबाव तयार करण्याचे आवाहन काही शिक्षक संघटना करीत आहे. काही शिक्षक संघटनांनी निलंबनाविरोधात मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देण्याची प्रक्रियासुद्धा सुरू केली आहे.

# युवा प्रशिक्षणार्थींची रक्तदानातून शासनाकडे हाक

## उद्याला ग्रामीण रुग्णालय चिखलदरा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

मेळघाट सारख्या दुर्गम भागात रक्तदान चळवळीचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी व गरजू आदिवासी रुग्णांना रक्ताची तातडीची मदत व्हावी यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही उद्याला सकाळी नऊ ते तीन पर्यंत ग्रामीण रुग्णालय चिखलदरा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर योजना मध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार केवळ राम काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य श्री प्रकाश साबळे, चिखलदराचे माजी नगराध्यक्षराजेंद्र सिंह सोमवंशी,सभापती राजेश मांगलेकर, माजी नगराध्यक्ष भास्करराव हरमकर, व मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहे.




तसेच तालुका आरोग्य अधिकारी श्री डॉक्टर आदित्य पाटील, ग्रामीण रुग्णालयाचे डॉक्टर जाकिर सर, डॉक्टर राम ठाकरे परतवाडा आदी मंडळी प्रमुख उपस्थिती म्हणून सहभाग घेणार आहे.


चिखलदरा परिसरात जवळपास दरवर्षी १०० गरोदर माता व स्तनदा माता यांना रक्ताची आवश्यकता असते. परंतु रक्ताचा प्रचंड तुटवडा असल्यामुळे गरजू रुग्णांना रक्तपुरवठा करण्यास अडचण निर्माण होते, त्यामुळे दिनांक ११ तारखेला होणारे रक्तदान शिबिर अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. सदर रक्तदान शिबिरासाठी सामान्य रुग्णालय अमरावतीची रक्तपेढीची टीम व टीमचे प्रमुख श्री डॉक्टर वाघमारे ही उपस्थित राहणार आहे.

रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी युवा प्रशिक्षणार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आकाश गडपाल, उपाध्यक्ष अक्षय सरोदे, ओम चित्रकार तसेच चिखलदरा येथील युवा सहकारी आदर्श गजभिये यांचे अथक प्रयत्न सुरू आहे. तरी सर्व तरुणांनी या शिबिरामध्ये सहभाग देऊन रक्तदान चळवळ व्यापक करावी अशी विनंती आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.

# आज सायंकाळी अंतराळातील आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्र डोळ्यांनी पाहता येणार.शुक्र, शनी, गुरुजवळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अकोला**

आकाशात विविध ग्रह तारकासोबतच मानव निर्मित आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्र फिरत्या चांदणीच्या स्वरूपात नुसत्या डोळ्यांनी पाहता येणार आहे. आज, १० जानेवारीला सायंकाळी महाराष्ट्रासोबतच मध्य भारतातील विविध भागातून हे केंद्र जात असल्याने त्याचे अधिक प्रकाशमान स्वरूपातील दर्शन निरभ्र आकाशात नुसत्या डोळ्यांनी होईल. यावेळी शुक्र, शनी, गुरू जवळ चंद्र आणि मंगळ ग्रह सहज पाहता येईल. या अनोख्या खगोलीय घटनांचा आनंद घेण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे संचालक प्रभाकर दोड यांनी केले आहे.



अवघ्या दीड तासात पृथ्वीची एक प्रदक्षिणा पूर्ण करणारे हे महाकाय आकाराचे आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्र मुंबई ते नागपूर एवढे अंतर केवळ दीड मिनिटांत पूर्ण करते. बहुपरिचित भारतीय वंशाच्या सुनीता विल्यम्स यामध्ये वास्तव्यास असून केवळ सात दिवसांच्या संशोधनासाठी त्या गेल्या. मात्र, 'स्टार लायनर' या परतीच्या यानात हेलियम वायू गळतीमुळे गेल्या सात महिन्यांपासून त्याच पृथ्वीवर येण्याच्या प्रतिक्षेत आहेत, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले.यावेळी आंतरराष्ट्रीय अंतराळ अभ्यास व संशोधन केंद्र हे भारताच्या मध्य भागातून जात असल्याने त्याच्या दर्शनाचा लाभ अधिक संख्येने घेता येईल. हे केंद्र पृथ्वीच्या ज्या भागातून जाते, त्या ठिकाणी ते फिरत्या चांदणीच्या स्वरूपात नुसत्या डोळ्यांनी पाहता येणार आहे. विविध ठिकाणातील बदलामुळे काहीसा दिशा, वेळ व तेजस्वीतेत फरक होईल. या फिरत्या चांदणीचा आरंभ पश्चिमेस खूप ठळक दिसणाऱ्या शुक्रा जवळून होईल. याच वेळी जवळच्या शनी ग्रहाचे व नंतर आज होणाऱ्या चंद्र व गुरु ग्रहाचे दर्शन घेता येणार आहे. आकाश मध्य भागात हे अंतराळ केंद्र अधिक तेजस्वी जवळ जवळ शुक्रा सारखे असेल. गुरु, चंद्राचे भेटीनंतर हे केंद्र लालसर मंगळाचे उत्तर आकाशात समारोप करताना दिसेल. दर्शन कालावधी सायंकाळी नैऋत्य आकाशात सुरू होऊन उत्तर-पूर्व अर्थात ईशान्य आकाशात संपुष्टात येईल. आकाशातील खुल्या मंडपात दिसणाऱ्या या दोन्ही घटनांचा आनंद आपण शक्य तितक्या अंधाऱ्या व मोकळ्या जागेतून अधिक चांगल्या प्रकारे घेता येणार आहे, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले. अवकाश प्रेमींसाठी ही दुर्मीळ घटना मोठी पर्वणी ठरणार आहे.



# नववर्षाच्या सात दिवसांत १७ लाचखोर जाळ्यात! राज्याचे चित्र : नागपूर क्षेत्रात सर्वाधिक आरोपी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

सरत्या वर्षाला निरोप देत सर्वांनीच नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले. नववर्षाच्या सुरुवातीपासूनच लाचखोरीची प्रकरणेही उघडकीस येत आहेत. १ ते ७ जानेवारी या कालावधीत लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चलुचपत राज्यातील १७ लाचखोरांवर कारवाई केली.

शासकीय, निमशासकीय काम करून देणे किंवा एखाद्या योजनेचा लाभ लवकरात लवकर मिळवून देण्याच्या नावाखाली अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून लाभार्थीना लाचेची मागणी केली जाते. या मागणीला अनेकजण बळी पडतात, तर काहीजण एसीबीकडे तक्रार नोंदवितात. या तक्रारीची एसीबीच्या पथकाकडून पडताळणी केल्यानंतर सापळा रचण्यात येतो. राज्यात १ ते ७ जानेवारी २०२५ या कालावधीत लाचेच्या ११ प्रकरणांत १७ आरोपींवर गुन्हे नोंदविण्यात आले.

**कोणत्या परिक्षेत्रात एकूण किती आरोपी**

मुंबई १, अमरावती १, ठाणे ३, छत्रपती संभाजी नगर ३, पुणे १, नाशिक ३, नांदेड ०, नागपूर ५

**नांदेड परिक्षेत्र निरंक**

लाचखोरीच्या प्रकरणात सर्वाधिक५ आरोपी नागपूर परिक्षेत्रातील आहेत. त्याखालोखाल ठाणे, नाशिक व छ. संभाजीनगर परिक्षेत्रातील प्रत्येकी ३ आरोपी आहेत. नांदेड परिक्षेत्रात नववर्षाच्या पहिल्या आठवड्यात लाचखोरीसंदर्भात एकही गुन्हा दाखल नाही.

# बारदाण्याअभावी सोयाबीन खरेदी रखडली; २४०० नोंदणी अर्ज प्राप्त

## आतापर्यंत १३ हजार ८७७.५ क्विंटल एवढी सोयाबीन खरेदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०यवतमाळ**

बाभुळगाव येथे नुकतेच नाफेड अंतर्गत सोयाबीन विक्रीसाठी नोंदणीस सुरुवात झाली. खाजगी बाजारात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याची होणारी लूट थांबविण्याच्या उद्देशाने शासनाने नाफेड अंतर्गत हमीभावात सोयाबीन खरेदी सुरू केली. त्यात आता बाजार समितीकडे बारदाना उपलब्ध नसल्याने खरेदी बंद ठेवण्यात आली.



बाभूळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीकडे नाफेड सोयाबीन खरेदीसाठी सुमारे २४०० नोंदणी अर्ज प्राप्त झाले आहे. त्यापैकी १९०४ अर्ज बुधवारी दि. ८ जानेवारीपर्यंत ऑनलाइन झालेले आहे. शेतकरी मात्र, बाजारभाव वाढीची प्रतिक्षा करीत आहेत.

प्रत्यक्षात भाववाढ न झाल्यामुळे शेवटच्या टप्प्यात नाफेडसाठी बरेच अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १६०७ शेतकऱ्यांचे शेडूलिंग झाले असून, १३ हजार ८७७.५ क्विंटल एवढी सोयाबीन खरेदी करण्यात आले. प्रत्यक्षात उर्वरित ८०३ अर्जधारकांची सोयाबीन खरेदी करायची असून बारदानाअभावी खरेदी रखडलेली आहे. त्यासाठी पत्रव्यवहार तसेच वारंवार तोंडी सूचना वरिष्ठांना देण्यात आलेल्या आहे. परंतु, वरिष्ठ कार्यालयाशी संपर्क साधला असता आपल्याकडे व कंपनीकडे बारदाना उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. शासनाने दिलेल्या मुदतीच्या आत खरेदी करण्यासाठी नाफेडमार्फत देण्यात येणारा बारदाना आपल्याकडे उपलब्ध करून द्यावा. बरदाणा उपलब्ध नसल्यास बाजार समितीद्वारे त्याच प्रतीचा किवा त्यापेक्षा चांगल्या प्रतीचा बारदाना खरेदी करण्यास बाजार समिती तयार असून बारदाना खरेदी करण्यासाठी परवानगी देण्यात यावी, असे दिलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. सदर पत्र बाभुळगाव बाजार समितीचे सभापती राजेंद्र पांडे व सचिव विलास गायकवाड यांच्या वतीने जिल्हा विपणन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

# विद्यापीठात बिबट्यानंतर आता पट्टेदार वाघाचे दर्शन

## वन खात्याच्या तपासणीत मात्र संकेत मिळाले नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

गेल्या पंधरवड्यात बिबट्याचा आठ महिन्याचा बछडा जेरबंद केल्यानंतर विद्यापीठाच्या त्याच परिसरात बुधवारी रात्री पट्टेदार वाघ दिसून आला. विद्यापीठाच्या सुरक्षा रक्षकाच्या या दाव्याची वन विभागाने गुरुवारी दिवसभर पडताळणी केली. परंतु त्यांना तेथे वाघाच्या अस्तित्वाचे संकेत दिसून आले नाही. वन विभागाच्या मते कदाचित तो तडसही असू शकतो. परंतु कोणताही प्राणी असला तरी नागरिकांनी दक्षता घेणे गरजेचे असून त्या भागात सकाळ-सायंकाळचे फिरणे बंद करण्याची सूचना केली आहे. तर या सूचनेनुसार विद्यापीठ प्रशासनाने मॉर्निंग आणि इव्हिनिंग अशा दोन्ही प्रहरातील नागरिकांच्या भटकंतीवर टाच आणली आहे. विद्यापीठ प्रशासनाच्या मते संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे एव्ही थिएटर आणि कला विभागाच्या मध्यभागी असलेल्या बोळीत हा वाघ दिसून आला. सायंकाळी सात ते साडे सातच्या दरम्यानची ही घटना आहे.




### परिसरात आवश्यक ती काळजी घेतली

ज्या भागात वाघ दिसून आला, असे सुरक्षा रक्षकांचे म्हणणे आहे, त्या भागातील मानवी वावर अत्यंत कमी करण्यात आला आहे. त्याच भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचीही इमारत आहे. त्यामुळे भाषा विभागासह त त्या विभागालाही सूचना देऊन सायंकाळच्या सुमारास भरणारे अभ्यासवर्ग आधीच आटोपून घ्यावेत, अशा सूचना दिल्या आहेत.

**डॉ. अविनाश असनारे, कुलसचिव**

सुरक्षा रक्षक घाबरल्यामुळे त्यांना त्यावेळी कोणतेही छायाचित्र घेता आले नाही. परंतु त्यांनी लगेच विद्यापीठ प्रशासनाला कळवले.त्यानंतर कुलगुरु, प्र-कुलगुरु आणि कुलसचिवांनी वन विभागाला कळवले. दरम्यानच्या काळात विद्यापीठातील सर्व सुरक्षा रक्षकांना एकत्र करून रात्रभर पाळत ठेवण्यात आली. सकाळी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून संपूर्ण परिसराची पाहणी केली. बराचसा परिसर पिंजून काढल्यानंतरही कोणतेही संकेत मिळाले नाहीत, असे वनाधिकारी अमोल गावनेर यांनी सांगितले. दरम्यान त्यांच्या सूचनेनुसार विद्यापीठ प्रशासनाने त्या भागात फलक लावले असून नागरिकांच्या भटकंतीवर टाच आणली आहे.

# आठवडी बाजारात बांधलेले ओटे भाजी विक्रेत्यांना द्या; मोर्शीकरांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मोर्शी**

बाजारात भाजीपाल्याचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना हक्काची जागा मिळावी यासाठी मोर्शी नगर परिषदेतर्फे अंदाजे ३ कोटी रुपये खर्च करून आठवडी बाजारात सिमेंट ओटे बांधलेले आहे. हे ओटे बांधून तयार झाले असल्यावर सुद्धा त्याचा वापर होत नसल्याने ते कशासाठी बांधले असा प्रश्न नागरिक करत आहे. आठवडी बाजारात बांधलेले ओटे भाजी विक्रेत्यांना देण्यात यावे, अशी मागणी मोर्शीकरांनी निवेदनाद्वारे मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.



शहरातील कायम वाहतूक व वर्दळीच्या मुख्य रस्त्यावरच दररोज भाजीबाजार भरत असल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. या गर्दीतूनच नागरिकांना पेठपुरा, आठवडी बाजार, गुजरी बाजार येथे जावे लागते. रस्त्यावरच भाजी बाजार भरत असल्याने या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होते, तर सामान्य नागरिकांना पायदळ जाण्यासाठी सुद्धा त्रास सहन करावा लागतो. या भागात नगर परिषदेचे गांधी मार्केट असून यामध्ये अनेक व्यावसायिकांनी लाखो रुपये खर्च करून आपली दुकाने थाटलेली आहेत. परंतु या दुकानासमोरच गेल्या अनेक वर्षांपासून भाजी मार्केटचे अतिक्रमण झाल्याने या दुकानदारांना सुद्धा त्रास सहन करावा लागतो. येथील भाजी बाजार अनेक वेळा नगर परिषद प्रशासनाच्या मार्फत हटवण्यात आला. परंतु, काही दिवसातच पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. बांधलेले हे ओटे भाजी विक्रेत्यांना द्यावे, अशी मागणी नागरिकांद्वारे करण्यात येत आहे.

# महाविकास आघाडीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दणदणीत पराभवाला सामोरं जावं लागलं. या पराभवाचा खापर ईव्हीएमवर फोडण्याचा प्रयत्न आघाडीच्या नेत्यांनी केला होता. परंतु, हा मुद्दा आता मागे पडला आहे. महाविकास आघाडीचे नेते आता एकमेकांवरच आरोप प्रत्यारोप करू लागले आहेत. काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी पराभवासाठी जागावाटपाला कारणीभूत ठरवलं. यानंतर आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या मुद्द्यावर जोरदार टोलेबाजी केली आहे. महाविकास आघाडीत समन्वय नाही हे सुद्धा त्यांनी मान्य केलं. महायुतीचं जागावाटप आमच्या दोन महिने आधीच संपलं होतं. विजय वडेट्टीवारांची खंत ही संपूर्ण महाविकास आघाडीची खंत आहे, असेही संजय राऊत म्हणाले आहेत. राऊत पुढे म्हणाले, जागावाटपाची प्रक्रिया उगाच लाबंवली, हे आमचं सर्वांचं मत आहे. ती का लाबंली हे वडेट्टीवारांना माहिती असावं. महायुतीचं जागावाटप आमच्या दोन महिने आधीच संपलं होतं. वडेट्टीवारांची खंत ही संपूर्ण महाविकास आघाडीची खंत आहे. होय, चुका झाल्या पण आता त्यावर चर्चा करण्यात काही अर्थ नाही.

# जिल्हा परिषदेच्या क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक महोत्सव ३० जानेवारी पासूनतारीख निश्चित ,मैदानाचा शोध सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

जिल्हा परिषदेच्या या वर्षीच्या क्रीडा स्पर्धा ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी या दरम्यान घेतल्या जाणार आहेत. त्यासाठी क्रीडांगणाचा शोध घेतला जात असून विभागीय क्रीडा संकुलात त्या होतील, अशी दाट शक्यता आहे. या क्रीडा महोत्सवाच्या जोडीने सांस्कृतिक महोत्सवही साजरा केला जाणार आहे.

कर्मचाऱ्यांचा कामाचा ताण कमी व्हावा आणि ते सतत नव्या जोमाने कार्यरत रहावे, यासाठी दरवर्षी जिल्हा परिषद आणि याच कार्यालयाशी निगडित जिल्ह्यातील पंचायत समिती कायार्लयातील कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. पुढे आंतरजिल्हा परिषद असा पाच जिल्ह्यांचा विभागीय पातळीवरील क्रीडा महोत्सवही घेतला जातो.



यावर्षी विभागीय क्रीडा महोत्सव केव्हा होणार हे निश्चित नसले तरी जिल्हा क्रीडा महोत्सवाच्या तारखा मात्र निश्चित झाल्याची सूत्रांची माहिती आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चालू महिन्याचे शेवटचे दोन दिवस आणि त्यापुढच्या महिन्याचे सुरुवातीचे दोन दिवस या दरम्यान हा महोत्सव होईल. प्रारंभी हा महोत्सव शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा संचालित शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानात भरवला जाणार होता. परंतु त्याचवेळी संबंधित संस्थेचाही कार्यक्रम असल्याने ते मैदान उपलब्ध होऊ शकले नाही. त्यामुळे पर्यायी मैदानाचा शोध घेतला जात आहे.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रांगण हाही एक पर्याय होता. परंतु त्याठिकाणी गेल्या वेळचा महोत्सव घेण्यात आला होता. दरम्यान यंदाचा क्रीडा महोत्सव नेमका कोणत्या मैदानात होणार, हे लवकरच स्पष्ट होणार असल्याचे जि. प. प्रशासनाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

### तारखा निश्चित, मैदानाचा शोध सुरू

लवकरच अंतिम निर्णय जिल्हा परिषदेचा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी या काळात घेतला जावा, यावर प्रशासन व कर्मचाऱ्यांमध्ये एकमत झाले आहे. त्यानुसार मैदानाचा शोध घेतला जात असून लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल.

**– पंकज गुल्हाने,**
**जिल्हाध्यक्ष, जि. प. कर्मचारी संघटना, अमरावती.**

# वैकुंठ एकादशी निमित्य बालाजी मंदिरात भक्तांची मांदियाळी .....





अमरावती शहरातील प्रसिद्ध बालाजी मंदिरात शुक्रवार दि.१० जानेवारीला वैकुंठ एकादशीनिमित्त बालाजी मंदिराचे वैकुंठद्वार उघडण्यात आले. या द्वारातून भगवान बालाजींचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी उसळली . वर्षातून एकदाच हे द्वार उघडले जाते. त्यामुळे सकाळी ६ वाजेपासून भाविकांनी बालाजींचे दर्शन घेतले. वैकुंठ एकादशीनिमित्त पालखी काढण्यात आली. मंदिरावर सुरेख विद्युत रोषणाई करण्यात आली. भाविकांना प्रसादाचे वितरण हि करण्यात आले. आज सकाळी भगवान बालाजीं चे विधिवत पूजा अर्चना केल्यानंतर पालखी काढण्यात आली त्यानंतर मंदिराचे वैकुंठद्वार उघडण्यात आले. यावेळी जय गोविंदा .... व्यंकटरमना गोविंदा च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

## नैसर्गिक आपत्तीग्रस्त अमरावती विभागातील शेतकऱ्यांना मिळणार नुकसान भरपाई

### रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने ५ लाख ३० हजार ४५ शेतकऱ्यांना ५३५ कोटी ६५ लाख ७४ हजार ८९३ रुपयांची मदत वित्तरित केली आहे. मदतीची ही रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव- पाटील यांनी दिली.

विभागाने शेतकऱ्यांचे ई-केवायसी त्वरित पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम राबवली, ज्यामुळे प्रलंबित प्रकरणांची पडताळणी जलद गतीने पूर्ण करण्यात आली. या धोरणात्मक उपक्रमामुळे बाधित शेतकऱ्यांना तत्काळ मदत वितरण करणे शक्य झाले



असल्याचे मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले. मार्च २०२३ पासून ९ हजार ३०७ कोटी रुपये डीबीटीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यांमध्ये थेट जमा करण्यात आले, असेही ते म्हणाले.

**अमरावती विभागात**

अमरावती जिल्ह्यातील १० हजार १३५ शेतकऱ्यांना १६ कोटी ११ लाख ८१ हजार ४५८ रुपये, बुलढाणा जिल्ह्यातील ६ हजार २६४ शेतकऱ्यांना ६ कोटी ९५ लाख ५६ हजार ६२० रुपये, अकोला जिल्ह्यातील ५ हजार ५५७ शेतकऱ्यांना ६ कोटी १७ लाख ६३ हजार ३८९ रुपये, यवतमाळ जिल्ह्यातील ५ हजार १७१ शेतकऱ्यांना ४ कोटी २६ लाख ७८ हजार ६ रुपये, वाशिम जिल्ह्यातील १ हजार ७९२ शेतकऱ्यांना १ कोटी ८५ लाख ७ हजार १७३ रुपये.

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीत लढल्या जाणार - एकनाथ शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १० ठाणे**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुका भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाने महायुतीत लढवून राज्यात सत्ता स्थापन केली असली तरी, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मात्र तिन्ही पक्ष स्वबळावर लढवतील, अशी चर्चा रंगली आहे. असे असतानाच, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीचे संकेत देत विधानसभा निवडणुकीनंतर आता महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद अशा निवडणुकांमध्ये महायुतीचा भगवा फडकवायचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

## सांगा साहेब, दीड हजार रुपयात निराधारांनी जगायचे तरी कसे? महागाईच्या काळात खर्चही भागेना : शासन लक्ष देणार काय?

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

निराधारांना आधार देणाऱ्या संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी, वृद्धापकाळ आदी योजनांच्या माध्यमातून मिळणारे अनुदान केवळ दीड हजार रुपये असल्यामुळे वाढत्या महागाईमुळे हे अनुदान तुटपुंजे ठरत आहे. विविध निराधार योजनांचा लाभ घेणाऱ्यांची जिल्ह्यातील संख्या लाखाच्या घरात आहे. सांगा साहेब, दीड हजारात निराधारांनी जगायचे तरी कसे? असा प्रश्न आहे



लाडकी बहीण योजनेअंतर्गत सरसकट महिलांना दीड हजार देणारे शासन निराधारांना मात्र तुटपुंजे अनुदान देऊन त्यांची बोळवण करीत आहे. दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. त्या तुलनेत मानधन वाढवून देण्याची मागणी आहे.

राज्य आणि केंद्र शासनाकडून निराधार, निवृत्ती, वृद्धापकाळ, दिव्यांगआदी योजना राबविण्यात येतात. योजनेअंतर्गत ६५ वर्षांखालील निराधार पुरुष व महिला, स्वतःचा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष, महिला, तसेच निराधार विधवांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.

या योजनेत २०१९ पर्यंत यावरील मानधन ९०० रुपये होते. त्यानंतर १००० रुपये करण्यात आले. त्यानंतर २०२२ पासून मानधन दीड हजार रुपये करण्यात आले आहे. महागाईच्या तुलनेत या योजनांचे मानधन कासवगतीने वाढविण्यात येते. दवाखान्याचा खर्च, औषधांच्या किमती, वाढती महागाई पाहता हे अनुदान अत्यंत तुटपुंजे ठरत असल्याचे दिसत आहे.गेल्या पाच ते सहा वर्षांचा विचार करता सर्वच वस्तूंच्या किमती जवळपास चौपट पटीने वाढल्या आहेत. त्यातच तुटपुंजे अनुदान तेही दोन-तीन महिन्यांनी एकदा जमा होत आहे. अशावेळी वयोवृद्ध लाभार्थी बँकांमध्ये हेलपाटे मारतात.


मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना योजना सुरू झाल्यापासून तातडीने दर महिन्याला मानधन दिले जात आहे. परंतु, निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना मानधनाअभावी शासनाने अडचणीत आणले आहे. लाडक्या बहिणींवरच सरकारचे प्रेम आहे. शासनाला निराधार लाडके नाहीत काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**दर महिन्याला लाभ मिळेना**

निराधार लाभार्थ्यांना शासनाच्या या योजनेचा मोठा आधार झाला आहे. मात्र, त्या अनुदानाचा लाभ लाभार्थ्यांना दर महिन्याला मिळत नाही. अर्थातच, शासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे जगण्यासाठी दररोजचा खर्च कसा करायचा? असा प्रश्न लाभार्थ्यांकडून उपस्थित होत आहे. शासनाकडून अनुदानासाठी तातडीने कारवाई होत नसल्याने लाभार्थी नाराजी व्यक्त करीत आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

## उत्पन्न वाढवून देणार त्याला लालपरी वाढीव भत्ता देणार

### विभागातील चालक, वाहकांना एस.टी.चे उत्पन्न वाढविण्याचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

राज्य परिवहन महामंडळाच्या एस.टी.ने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वेळेत निश्चितस्थळी सुखरूप पोहोच करणे, हे एस.टी.साठी दिवसेंदिवस मोठे आव्हानात्मक काम होत चालले आहे. मागील काही वर्षांत एस.टी. बसच्या अपघातांचे प्रमाणात वाढ झाली आहे. प्रवाशांसोबतच महामंडळाने चालक आणि वाहकांना देखील पगारासोबतच १० टक्के अधिकचा भत्ता मिळविण्यासाठी प्रवाशांचे उद्दिष्ट्य ठेवले आहे.

विभागातील चालक वाहकांनादेखील दहा टक्के भत्ता घेण्यासाठी महामंडळाच्या प्रवासी वाहून आणण्याच्या योजनेवर खरे उतरावे लागणार आहे. पगाराव्यतिरिक्त दहा टक्के अधिकचा भत्ता मिळविण्यासाठी चालक-वाहकांसाठी ३१ जानेवारी ही शेवटची तारीख आहे. त्यामुळे विभागातील जास्तीत जास्त चालक वाहकांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी महामंडळाच्या नियमांचे पालन करून प्रवाशांची वाढ करावी लागणार आहे.एस.टी. महामंडळाकडून चालक आणि वाहक यांच्या उत्पन्नात भर घालण्यासाठी प्रोत्साहन भत्ता योजना राबविण्यात येते. यासाठी एस.टी.ला देखील चालक वाहक यांच्याकडून अपेक्षित उत्पन्नाची अपेक्षा आहे.चालक वाहकांनी एस.टी.च्या उत्पन्नात भर घातल्यास पगारासोबतच दहा टक्के रक्कमदेखील त्यांच्या खात्यावर महामंडळाकडून रक्कम जमा करण्यात येणार आहे.

**३१ जानेवारीपर्यंत मुदत**

१ ते ३१ जानेवारी अशी ही योजना आहे. त्यासाठी चालक-वाहकाने चालविलेल्या मार्गावरील महिन्याचे उत्पन्न तपासण्यात येणार आहे.

**खासगी वाहतुकीचा सुळसुळाट बंद होणार**

एस.टी.च्या उत्पन्नात भर पडल्यास चालक-वाहकास प्रोत्साहित भत्ता देण्यात येतो. आहे. यामुळे खासगी वाहतकीचा सळसळाट बंद होईल.

## विद्यार्थ्यांनो; पोस्टाच्या स्टॅम्पचा संग्रह करा, शिष्यवृत्ती मिळवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

भारतीय पोस्ट विभागाने इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी दरमहा ५०० प्रमाणे वार्षिक सहा हजार रुपयांची शिष्यवृत्ती देणारी दीनदयाळ स्पर्श योजना सुरू केली आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये पत्रव्यवहार करण्याची तसेच स्टॅम्पचा अभ्यास करून त्याचा संग्रह करण्याची आवड निर्माण होणे, हा योजनेचा उद्देश आहे. ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता चांगली आहे. तसेच, छंद (फिलाटली) म्हणून टपाल तिकिटांचा संग्रह आणि त्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देऊन गौरविण्यात येते.पोस्ट विभागाच्या स्टॅम्पचा संग्रह करून त्याचा कॅटलॉग करणे. जुने स्टॅम्प शोधून त्यांचे जतन करून प्रदर्शन करणे. त्यावर अधिक संशोधन करणे, असे विविधांगी छंद जोपासणाऱ्या विद्यार्थ्यांची योजनेसाठी निवड केली जाते. शासकीय, खासगी शाळेतील विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

**अर्ज कोण करू शकेल?**

कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेत शिकणारा सहावी ते नववी इयत्तेतील विद्यार्थी अथवा विद्यार्थिनी या योजनेसाठी अर्ज करू शकतो. सरकारी आणि खासगी दोन्ही शाळांमधील विद्यार्थी यासाठी अर्ज करू शकतात.शिष्यवृत्तीसाठी ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून परीक्षा पास विद्यार्थी योजनेसाठी पात्र आहेत. एससी, एसटी श्रेणीतील विद्यार्थ्यांसाठी ५५ टक्के गुण आवश्यक,

**काय आहेत नियम?**

प्रत्येक पोस्टल सर्कल इयत्ता सहावी ते नववी पर्यंतच्या प्रत्येकी १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देते. भारतीय डाक मान्यताप्राप्त शाळांमध्ये शिकणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम दर तीन महिन्यांनी वितरित केली जाते. शिष्यवृत्तीसाठीची निवड एका वर्षासाठी असते. पूर्वी निवडलेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षीही शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो. शाळेमध्ये फिलाटली क्लब नसल्यास विद्यार्थ्यांचे स्वतःचे फिलाटली डिपॉझिट खाते विचारात घेतले जाते.

## संसाराचा गाडा नेटाने हाकणार; महिला पिंक रिक्षा चालवणार !

### महिलांना रिक्षा व्यवसायासाठी अर्थसाह्य :अमरावती शहरांसह १७ शहरांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

मुली व महिलांना रोजगारनिर्मितीसाठी चालना देत, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे, तसेच महिला व मुलींचा प्रवास सुरक्षित होण्यासाठी महिलांसाठी 'पिंक ई-रिक्षा' खरेदीसाठी अर्थसाह्य करण्याची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पात केली होती. त्यानुसार या योजनेअंतर्गत १७ शहरांतील महिलांचे अर्ज प्राप्त व्हायला सुरुवात झाली आहे. या योजनेअंतर्गत चार लाखांपर्यंतच्या ई-रिक्षा खरेदीसाठी बँकेतून ७० टक्के रक्कम कर्ज स्वरूपात दिली जाणार आहे. २० टक्के रक्कम राज्य शासन देणार असून, १० टक्के रक्कम लाभार्थ्याला भरावी लागणार आहे. बँकेच्या कर्जाची पाच वर्षात परतफेड करावी लागणार आहे. निश्चित केलेल्या लाभार्थ्यांपेक्षा जादा अर्ज आल्यास लॉटरी पद्धतीने निवड केली जाणार आहे. या योजनेमुळे पात्र महिलांना मोठा दिलासा मिळणार असून, कुटुंबाच्या चरितार्थासाठी हातभार लागण्यास त्यांना मदत होणार आहे.तसेच महिला आणि युवतींना सुरक्षित प्रवासासाठी आणखी एक सुविधा उपलब्ध होणार आहे.योजनेच्या



लाभासाठी ऑनलाइन अर्ज, लाभार्थ्यांचे आधार व पॅनकार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, कुटुंबप्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला, वार्षिक उत्पन्न, बँक खाते पासबुक व पासपोर्ट आकाराचा फोटो लागणार आहे.राज्यातील गरजू आणि २० ते ४० वर्षे वयोगटातील, तीन लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न, वाहनचालक परवाना असलेल्या महिला व मुली, विधवा, घटस्फोटित, राज्यगृहातील इच्छुक प्रवेशित, अनाथ प्रमाणपत्रप्राप्त युवती, अनुरक्षणगृह, बालगृहातील आजी व माजी प्रवेशित तसेच दारिद्र्यरेषेखालील महिलांना प्राधान्य राहणार आहे.या 'पिंक ई-रिक्षा' केवळ महिला व मुलींसाठीच आहेत. यामुळे या रिक्षा पुरुष चालकाने चालविल्यास त्यांच्यावर कारवाई होणार आहे. वाहतूक व परिवहन विभागाला त्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

**पिंक रिक्षा योजना काय आहे?**

रोजगारनिर्मितीसह महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पिंक रिक्षा योजना राज्य शासनाने राबवायला सुरुवात केली आहे. गेल्या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीनुसार राज्यातील १७ शहरांतील एकूण दहा हजार महिला लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. पुणे, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अहिल्यानगर, नागपूर आणि अमरावती या आठ जिल्ह्यांत प्राथमिक स्तरावर ही योजना राबविण्यात येणार आहे.